# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०२/०६/२०२०

### जिल्हा : जळगाव

### हवामान अंदाज :

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०२/०६/२०२० ते ०६/०६/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| पाऊस (मिमी) | 23 | 34 | 5 | 4 | 5 |
| कमाल तापमान (अं.से.) | 39 | 39 | 39 | 37 | 37 |
| किमान तापमान (अं.से.) | 22 | 23 | 23 | 23 | 23 |
| ढग स्थिती (आकाश) | 8 | 8 | 6 | 1 | 1 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 70 | 81 | 69 | 70 | 68 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 36 | 59 | 36 | 35 | 40 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 18 | 32 | 14 | 16 | 16 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 70 | 272 | 268 | 271 | 272 |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खा -त्याच्या अंदाजानुसार अरबी समुद्रामध्ये निर्माण झालेल्या चक्री वादळामुळे जिल्हयात दिनांक ०२ व ०३ जून रोजी बहुतांश ठिकाणी, दि. ०४ जून रोजी अनेक ठिकाणी, दि. ०५ व ०६ जून २०२० रोजी काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.<br>ईशारा : दिनांक ०२ जून २०२० रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट व सोसाट्याच्या वाऱ्यासह (वाऱ्याचा वेग ताशी ४० - ५० कि.मी.) जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. दिनांक ०३ जून २०२० रोजी अनेक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार तसेच तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून दिनांक ०४ जून २०२० रोजी तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • पाऊसाची शक्यता असल्याने काढलेली पिके पावसापासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने योग्यरीत्या झाकून ठेवावीत. पाऊसापासून बचावासाठी उघडयावरील धान्य सुरक्षित स्थळी हलवावे.<br>• जनावरे सुरक्षीत ठिकाणी बांधावीत.<br>• पक्व फळांची व फळभाजांची लवकरात लवकर काढणी करावी.<br>• काढणी केलेल्या पिकांची व धान्याची सुरक्षित स्थळी साठवणूक करावी.<br>• पावसाचा अंदाज बघून पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करावी.<br>• खरीप हंगामामध्ये पिक घेण्यासाठी विद्यापीठ विक्री केंद्र किंवा शासन मान्यता प्राप्त विक्री केंद्र यांकडून बियाणे खरेदी करावे. |
| कापूस | पूर्व तयारी व पेरणी | कापसावरील सेंद्रिय बोंड अळीच्या नियंत्रणासाठी कापुस पेरणीपुर्वी आधीच्या पिकांची धसकटे, पळकाट्या, पाला व इतर कचरा गोळा करुन तो जाळावा व शेत स्वच्छ ठेवावे. त्यामुळे कीड व रोग यांच्या सुप्तावस्था नष्ट होण्यास मदत होते. कापसाची पेरणी वेळेवर, योग्य अंतरावर व खोलीवर |

| | | |
|---|---|---|
| | | करणे अत्यंत अवक्श्यक आहे. |
| भुईमुग | काढणी व साठवणूक अवस्था | योग्य पक्वतेला पिकाची काढणी करावी व सुरक्षित स्थळी साठवणूक करावी. |
| आंबा | फळ पक्वता ते काढणी अवस्था | आंब्यावरील फळमाशीच्या नियंत्रणासाठी मिथिल युजेनॉल युक्त रक्षक सापळे बागेमध्ये एकरी ८-१० याप्रमाणे लावावेत. पक्व झालेल्या आंब्याची काढणी शक्यतो सकाळी दहापुर्वी किंवा दुपारी ४ नंतर करावी तसेच आंबा फळांची वाहतुक शक्यतो संध्याकाळी करावी. तयार झालेली आंब्याची फळे काढून सुरक्षित ठिकाणी पिकण्यासाठी ठेवावे. |
| भेंडी व टोमॅटो | फळधारणा | भेंडी व टोमॅटोवरील फळपोखरणा-या अळीच्या व्यवस्थापनासाठी किडलेली फळे मातीत पुरुन टाकावीत तसेच डेल्टामेथ्रीन २.८ **%** ईसी ८ मिली किंवा क्विनॉलफॉस २५ **%** ईसी २० मिली किंवा लॅम्ब्डा सायहॅलोथ्रीन ५% ईसी ६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. |
| केळी | | झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गर्जेप्रमाणे बांबूच्या किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पाट्यांच्या सहयायाने झाडांना/ घडाना आधार/ टेकू द्यावा. केळीच्या बुंध्याजवळ वाढणारी पिल्ले नियमित कापावीत तसेच केळीवरील जुनी वाळलेली व रोगट पाने कापून बाग स्वच्छ ठेवावी. |
| लिंबू वर्गीय पिके | | सिट्रस सायला या रस शोषणाऱ्या किडीच्या नियंत्रणासाठी १० मिली क्विनॉलफॉस २५% प्रवाही किंवा ५.५ मिली नोवालुरॉन १०% प्रवाही प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जनावरांना पोटातील जंताच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे. जनावरांना रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे तसेच जनावरांना व पक्ष्यांना नेहमी पिण्यास स्वछ व थंड पाणी द्यावे. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.** | | |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : ०२.०६.२०२०

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**